डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

**संदर्भ : रासेयो/४५/१८** **दि. ०३/०५/२०१८**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**

**पुणे, अहमदनगर व नाशिक**

**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : सन २०१७–१८ साठी जिल्हास्तरीय, विद्यापीठ राज्यस्तरीय, राष्ट्रीय पुरस्कार प्रस्तावांसाठी मुदतवाढ**

मा. महोदय,

दरवर्षीप्रमाणे सन २०१७–१८ साठी जिल्हा, विद्यापीठ, राज्यस्तरीय व इंदिरा गांधी राष्ट्रीय पुरस्कारासाठी रासेयो संलग्नित महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. उत्कृष्ट स्वयंसेवक/ कार्यक्रम अधिकरी/ महाविद्यालय असे पुरस्कार राष्ट्रीय सेवा योजनेच्या रौप्यमहोत्सवी वर्षापासून महाराष्ट्र शासन व केंद्रशासन यांच्याकडून दिले जातात. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडूनसुद्धा जिल्हा व विद्यापीठ पातळीवर रासेयो पुरस्कार दिले जातात. या अनुषंगाने प्रस्ताव पाठवावेत, असे जाहीर केले होते.

उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना एकक व कार्यक्रम अधिकारी यांच्या प्रस्तावाकरिता फक्त मागील तीन वर्षातील उपक्रमांचा व उत्कृष्ठ राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक यांच्या प्रस्तावाकरिता मागील दोन वर्षांच्या उपक्रमांचा उल्लेख असावा. तरी वरील पुरस्कारासाठी प्रस्ताव विद्यापीठाकडे **दि. २ मे २०१८** पूर्वी पाठविणे आवश्यक होते. आता ही मुदत **दि. १६ मे २०१८** अशी केली आहे. तरी दि. **दि. १६ मे २०१८** पर्यंत संबधितांनी प्रस्ताव पाठवावेत. अपूर्ण असलेले व अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

**सोबत : १. रासेयो विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई यांची पुरस्कार प्रस्तावासंबधीची मार्गदर्शिका**
**२. प्रस्तावाचे नमुने (मराठी व इंग्रजी)**

सत्यमेव जयते

राष्ट्रीय सेवा योजना

राज्य स्तरीय पुरस्कार

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष,**

**एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,**

**३ महापालिका मार्ग, धोबीतलाव,**

**मुंबई**

संक्षिप्त रुपसूची

| | | |
|---|---|---|
| ए.आय.यू. | - | भारतीय विद्यापीठ संघ |
| एन.एस.एस. | - | राष्ट्रीय सेवा योजना |
| टी.ओ.सी. | - | प्रशिक्षण आणि अनुकूलन केंद्र |
| टी.ओ.आर.सी. | - | प्रशिक्षण, अनुकूलन आणि अन्वेषण केंद्र |

# राज्य स्तरीय रा.से.यो. पुरस्कार

## १. भूमिका

**१.१** राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) (एन.एस.एस.) महात्मा गांधींच्या जन्मशताब्दी वर्षापासून (१९६९) सुरु करण्यात आली. ही योजना सुरुवातीपासूनच महाराष्ट्रामध्ये राबविण्यात येत आहे. आज या योजनेमध्ये महाराष्ट्रात सुमारे ३,५०,००० विद्यार्थी / विद्यार्थिनी वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहभागी होत असतात. महाराष्ट्रात ही योजना सुमारे ३००० महाविद्यालयामधून राबविली जाते.

**१.२** रा.से.यो.चा उद्देश सामुदायिक सेवा कार्यामार्फत व्यक्तीमत्वाचा विकास असा असून, या उद्देश पूर्ततेसाठी स्वयंसेवक विद्यार्थी व कार्यक्रम अधिकाऱ्यांना शाश्वत व सकारात्मक अशा कामांसाठी एकत्रित केले जाते. स्वच्छता मोहिम, श्रमदान, जल साक्षरता, सांप्रदायिक सद्भावना, सामाजिक संपत्तीची निर्मिती, रस्ता सुरक्षा अभियान, रक्तदान, पर्यावरण सुरक्षा, साक्षरता अभियान, आरोग्य शिक्षा अभियान, एड्स निर्मूलन, व्यसन मुक्ती अशा जनजागरण अभियानात स्वयंसेवक विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्यात येते. योजनांतर्गत प्रत्येक स्वयंसेवकाला दोन वर्षामध्ये २४० तास सामाजिक सेवेचे कार्य करावे लागते. तसेच दोन वर्षातून एकदा दत्तक गावी सात दिवस निवासी शिबीरात सहभागी व्हावे लागते.

**१.३** रा.से.यो. स्वयंसेवकांना कार्यक्रम अधिकाऱ्यांना, महाविद्यालय तसेच विद्यापीठांना रा.से.योजनेद्वारे केल्या गेलेल्या ऐच्छिक सेवेला मान्यता प्रदान करण्यासाठी या योजनेअंतर्गत प्रोत्साहन म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

## २. लक्ष

राज्य स्तरीय रा.से.यो. पुरस्कार योजनेचे खालील लक्ष आहे.

**२.१** विद्यापीठ रा.से.यो. कक्ष / +२ स्तर कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालय तसेच रा.से.यो. स्वयंसेवकांना त्यांनी केलेल्या उत्कृष्ट सामाजिक सेवेला मान्यता प्रदान करणे.

**२.२** युवक रा.से.यो. विद्यार्थी स्वयंसेवकांना सामाजिक सेवा व सकारात्मक सामाजिक प्रवृत्ती आणि मुल्यांद्वारा त्यांच्या व्यक्तीमत्व विकासास प्रोत्साहन देणे.

## ३. पुरस्कारासाठी विचार करावयाच्या पात्रता अटी

### ३.१ विद्यापीठ / +२ स्तर :-

अ) विद्यापीठ / +२ स्तर जे गेल्या ३ वर्षापासून लागोपाठ राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम आयोजित करत आहेत, त्यांचा विचार केला जाईल.

ब) संस्थांनी आपल्या कार्यक्रमाचे अहवाल, लेखे व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यामध्ये अत्यंत नियमित व वेळेचे बंधन पाळण्यामध्ये तत्पर असणे आवश्यक आहे.

क) ज्या वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेच्या पुरस्कारासाठी विचार करावयाचा आहे, त्या वर्षाच्या कमीत कमी ३ वर्षाआधी लागोपाठ विशेष शिबीर कार्यक्रम व इतर वास्तविक नोंदणीचे १००% लक्ष प्राप्त करावयाचे आहे.

ड) सर्व राष्ट्रीय सेवा योजना एककाद्वारे सर्वांगीण विकास, संपूर्ण गाव स्वच्छ करणे, तसेच सकल साक्षरतेसाठी गाव / झोपडपट्टी व इतर गलिच्छ वस्ती दत्तक घेणे आवश्यक आहे.

इ) राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या प्रस्ताव वर्षी कोणतीही सतर्कता बाब / चौकशी प्रलंबित नसावी.

फ) ज्या वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेच्या पुरस्कारासाठी विचार करावयाचा आहे, त्या वर्षाच्या कमीत कमी ३ वर्षाआधी सातत्याने २४० तास काम करणाऱ्या स्वयंसेवकांचे प्रमाण कमीत कमी ९०% असणे आवश्यक आहे.

ग) ज्या विद्यापीठाला शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला असेल, असे विद्यापीठ पुढील ५ वर्ष पुरस्कारासाठी पात्र राहणार नाही.

घ) विद्यापीठांनी ५ गावे दत्तक घेणे बंधनकारक असून, त्याच विद्यापीठांचा पुरस्कारासाठी विचार केला जाईल.

ज) १०० विद्यार्थ्यांच्या प्रमाणानुसार १ एकक याप्रमाणे विद्यापीठ अधिनस्त महाविद्यालयामध्ये एककांची संख्या असणे आवश्यक आहे.

#### ३.१.१ <u>प्रस्ताव छाननीसाठी मुख्य बाबी (१५० गुण)</u>

अ) मागील तीन / पाच वर्षातील विद्यापीठांनी नोंदणी केलेली प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या (प्रतिवर्षाच्या सरासरीनुसार १००% असल्यास १० गुण, ८०% असल्यास ८ गुण याप्रमाणे गुणदान )

ब) i) नियमित अहवाल व सांख्यिकीय माहिती सादर करणे (५ गुण)

ii) नियमित निधी वितरण (५ गुण)

क) २४० तास काम / कार्य पूर्ण करणाऱ्या स्वयंसेवकांची टक्केवारी (१००% असल्यास १० गुण, ९०% असल्यास ७ गुण, ८०% असल्यास ५ गुण, कुलगुरुंच्या सहीच्या प्रमाणपत्रांचे क्रमांक असलेले प्रतिज्ञापत्र आवश्यक)

ड) विशेष शिबीर कार्यक्रमामध्ये सहभागी होणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची टक्केवारी (प्रतिवर्षाच्या सरासरीनुसार १००% असल्यास १० गुण व नंतर १०:१ याप्रमाणे कमी गुण दिले जातील )

इ) गेल्या तीन वर्षामध्ये खालील उपक्रमांची साध्यता (जास्तीत जास्त ५० गुण)

१) वृक्षारोपण (प्रति विद्यार्थी एक झाड, उदा. विद्यापीठाची विद्यार्थी संख्या ४६००० असल्यास, ४६००० झाडे लावणे अपेक्षित आहे. त्यानुसार १००% किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास १० गुण व १०% :१ याप्रमाणे गुण कमी दिले जातील. )

२) रक्तदान शिबीर संख्या व रक्तसंकलन/ अवयव दान/ देहदान (अवयव दान व देहदानासाठी प्रोत्साहन करणे व अर्ज भरुन घेणे, इ. ) (१० गुण) तथापि रक्तदान शिबीर व रक्तदानासाठी गुणदान पुढीलप्रमाणे- (प्रति विद्यार्थी रक्त संकलन १० गुण, मुद्दा क्र. इ-१ प्रमाणे नियम)

३) एड्स जनजागृती रॅली (जास्तीत जास्त १ गुण)

४) साक्षरता (१००% असल्यास २ गुण किंवा कमी)

५) पल्स पोलिओ मोहिम (जास्तीत जास्त २ गुण)

६) शाश्वत कामाचे मुल्यमापन रुपयामध्ये.

उदा. रस्ता तयार करणे/रस्ता दुरुस्ती, इ. (५ गुण),

वनराई बंधारे/विहीर/नालाबंडींग, इ. (५ गुण), शौचालय (१० गुण)

७) रस्ता सुरक्षा अभियान (जास्तीत जास्त ५ गुण)

फ) कार्यक्रम समन्वयक या नात्याने गेल्या ३ वर्षामध्ये त्यांनी पुढाकार घेऊन वर उल्लेखलेल्या उपक्रमांव्यतिरिक्त आयोजीत केलेल्या उपक्रमांना प्रत्येकी २ गुण, जास्तीत जास्त २० गुण (२० गुण)

ग) विविध क्षेत्रामध्ये गेल्या ३ वर्षामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेमधील चाकोरीबाहेरील योगदान (Outstanding contribution in NSS)

(२५ गुण [प्रत्येक उपक्रमास ३ गुण याप्रमाणे])

ह) विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा राष्ट्रीय एकात्मता शिबीर, मेगा शिबीर, राज्यस्तरीय 'आव्हान', प्रेरणा शिबीर, उत्कर्ष, साहसी क्रिडा शिबीरातील सहभाग/ आयोजन (सहभागास प्रत्येकी ५ गुण (जास्तीत जास्त २० गुण) व आयोजनास २० गुण)

**३.२ महाविद्यालय एकक व कार्यक्रम अधिकारी**

अ) महाविद्यालय क्षेत्रातील व आजूबाजूच्या परिसरामध्ये महाविद्यालयाची व कार्यक्रम अधिकाऱ्यांची तसेच राष्ट्रीय सेवा योजनेची प्रतिष्ठा.

ब) राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम व कार्य प्रणाली सुदृढ व प्रभावी बनविण्यामध्ये कार्यक्रम अधिकारी व प्राचार्य यांचेबरोबर केलेले प्रयत्न.

क) महाविद्यालयाद्वारे दत्तक घेतलेले गाव /गलिच्छ वस्ती / समाजासाठी स्थिर संपत्ती निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न होणे आवश्यक.

ड) महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकाऱ्याची नियुक्ती राष्ट्रीय सेवो योजनेसाठी आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणेच होणे आवश्यक आहे.

ई) ज्या महाविद्यालयाचा पुरस्कारासाठी विचार केला जाणार असेल त्या महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी कमीत कमी मागील ३ वर्षापासून कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत असणे आवश्यक आहे. तसेच टी.ओ.सी./टी.ओ.आर.सी. मधून प्रशिक्षण घेतलेले असावे.

उ) महाविद्यालय / महाविद्यालयाच्या कार्यक्रम अधिकाऱ्याविरुध्द कोणतीही सतर्कता बाब / चौकशी प्रलंबित नसावी.

**३.२.१ प्राप्त प्रस्ताव छाननीसाठी मुख्य बाबी (२३० गुण)**

अ) ज्या वर्षासाठी पुरस्काराबाबत विचार केला जाणार आहे, त्यापुर्वी ५ वर्षे लागोपाठ राष्ट्रीय सेवा योजना एकक अस्तित्वात असणे आवश्यक आहे.

ब) मागील ३ वर्षामध्ये महाविद्यालयाने नोंदणी आणि विशेष शिबीराचे १००% लक्ष लागोपाठ प्राप्त केलेले असावे.

क)मागील ३ वर्षातील मंजूर व प्रत्यक्ष नोंदविलेले विद्यार्थ्यांचे प्रमाण प्रतिवर्षी सरासरी काढून १० गुण (१००% असल्यास १० गुण ८०% असल्यास ८ गुण)

ड) विशेष शिबीर कार्यक्रमाचे उद्दिष्ट निश्चित करणे व शिबीर कालावधीत सर्व उद्दिष्टये पूर्ण करणे (१००% असल्यास १० गुण, त्यानुसार कार्य असल्यास उतरत्या क्रमाने गुण अदा केले जातील)

इ) मागील ३ वर्षात उभारण्यात आलेले स्थायी प्रकल्पांबाबत माहिती (प्रत्येकी २ गुण जास्तीत जास्त २० गुण)

ई) दत्तक क्षेत्रामध्ये प्राप्त केलेल्या साक्षरतेची टक्केवारी (१००% असल्यास ५ गुण व त्यापेक्षा कमी असल्यास कमी गुण)

उ) रा.से.यो. उपक्रम अधिक कृतीशील करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक व इतर संस्थांच्या माध्यमातून केलेले कार्य (५ गुण )

ऊ) रा.से.यो.तील शाश्वत कामाचे मुल्यमापन (३५ गुण)

i) रस्ता दुरुस्ती, कच्चा रस्ता तयार करणे इ. (५ गुण)

ii) वनराई बंधारे / नाला बंडींग / समतलचर / विहिर पुनर्भरण (१० गुण)

iii) शौचालय निर्मिती (१० गुण)

iv) शेततळ निर्मिती (१० गुण)

ए) नाविन्यपूर्ण/सृजनशील उपक्रमांचा तपशील (प्रत्येकी २ जास्तीत जास्त १० गुण)

ऐ) जिल्हा / विद्यापीठ / राज्य / राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमातील योगदान व आयोजन (५ गुण जिल्हा स्तर, १० गुण विद्यापीठ, १५ गुण राज्य आणि १५ गुण राष्ट्रीय स्तरावरील शिबीर आयोजित केल्यास जास्तीत जास्त ३० गुण)

प) मागील ३ वर्षातील समाजोपयोगी उपक्रम (५० गुण)

i) वृक्षारोपण प्रति विद्यार्थी एक झाड (५ गुण)

ii) आरोग्य शिबीरे तथा रक्तदान शिबीर (प्रति शिबीर ५ गुण जास्तीत जास्त १० गुण)

iii) स्वच्छता मोहिम (राष्ट्र पुरुषाचे स्मारक दत्तक घेणे ५ गुण, ऐतिहासिक स्थळ / किल्ले १० गुण, नदीपात्र / तलाव ५ गुण – जास्तीत जास्त २० गुण)

iv) शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी स्थायी स्वरुपाचे उपक्रम (१५ गुण)

फ) महाविद्यालय / स्वयंसेवकांना गेल्या ३ वर्षात प्राप्त पुरस्काराची यादी. (इंदिरा गांधी पुरस्कार असल्यास ५ गुण, राज्य पुरस्कार असल्यास ५ गुण, जास्तीत जास्त १० गुण)

ब) मागील ३ वर्षात महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावास राज्य शासनाचा स्वच्छतेवर आधारित निर्मलग्राम किंवा तत्सम पुरस्कार प्राप्त झाल्यास (१० गुण)

भ)महाविद्यालयाने विविध शिबीरांसाठी विद्यार्थ्यांनी प्रोत्साहित केले असल्यास शिबीराचे नाव व विद्यार्थी संख्या ('आव्हान' १० गुण, 'साहसी क्रिडा शिबीर ५ गुण, प्रेरणा शिबीर ५ गुण, उत्कर्ष ५ गुण व राष्ट्रीय एकात्मता किंवा तत्सम शिबीर १० गुण, जास्तीत जास्त ३० गुण)

म) महाविद्यालयातील शिबीरात सह प्राध्यापकांचे उपक्रम राबविण्यासाठी दिलेले योगदान (उदा.सर्वेक्षणासाठी मदत, समतलचर काढण्यासाठी उताराचे मोजमाप, सांख्यिकीय माहिती एकत्रित करण्यासाठी सहाय्य, रक्तगट तपासणी, पाणी परिक्षण, माती परिक्षण इत्यादिंसाठी सहाय्य (५ गुण)

## ३.३ राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक

अ) रा.से.यो. स्वयंसेवक म्हणून सलग २ वर्षे रा.से.यो. उपक्रमात सहभाग असणे आवश्यक आहे.

ब) रा.से.यो. स्वयंसेवकांनी एका विशेष हिवाळी शिबीरात सहभाग घेतलेला असावा. या व्यतिरिक्त विद्यापीठाने आयोजित नेतृत्व विकास शिबीर किंवा राज्य व राष्ट्रीय स्तरावरील एकात्मता शिबीर व राष्ट्रीय प्रेरणा शिबीरात, राष्ट्रीय / पुर्व राष्ट्रीय

प्रजासत्ताक संचलन शिबीर, मेगा शिबीर, राष्ट्रीय साहसी शिबीर, युवा महोत्सव इत्यादिमध्ये सहभागी झाले असावेत.

क) रा.से.यो.पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करताना स्वयंसेवक विद्यार्थी / विद्यार्थिनीचे वय १६ वर्षापेक्षा कमी व २५ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच अनुसूचित जाती व जमातीच्या स्वयंसेवकांकरिता जास्तीत जास्त वयाची मर्यादा ३ वर्षे वाढीव राहील म्हणजे त्यांचे वय २८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

ड) स्वयंसेवकाने २ वर्षात सार्वजनिक सेवेत सहभागी झालेल्या कार्यक्रमांच्या नोंदी स्वयंसेवकास पुरविलेल्या दैनंदिनीमध्ये नोंद असणे आवश्यक आहे. रा.से.यो. दैनंदिनीची झेरॉक्स प्रत जोडावी.

इ) रा.से.यो. स्वयंसेवकांची शैक्षणिक प्रगती चांगली असावी. ए.टी.के.टी. व पुर्नप्रवेश यांचा पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही.

फ) स्वयंसेवकाकडे सलग २ वर्षामध्ये प्रतिवर्षी १२० तास याप्रमाणे २४० तास समाजोपयोगी रासेयो उपक्रमात सहभागी होऊन पूर्ण केले पाहिजे.

**३.३.१ पुरस्कारांसाठी प्रस्तावात अपेक्षित मुख्य बाबी व त्यानुसार मिळणारे गुण (१५०)**

अ) महाविद्यालय / संस्था व रासेयो एककात विद्यार्थी स्वयंसेवकांचे सकारात्मक मत असणे व कार्यक्रमांसाठी स्वत:चा सहभाग व नियमितता असणे आवश्यक आहे.

ब) रा.से.यो.मध्ये स्वयंसेवकांचे २४० तासापेक्षा जास्त तास केले असल्यास पुढील ५० तासासाठी ५ गुण जास्तीत जास्त १० गुण)

क) राज्य शासनाने राबविलेल्या उपक्रमामध्ये सहभाग असल्यास (राज्य प्रजासत्ताक दिन संचलन १० गुण 'आव्हान', आपत्ती व्यवस्थापन शिबीर १० गुण, 'उत्कर्ष', सामाजिक, सांस्कृतिक महोत्सव ५ गुण, 'प्रेरणा' नेतृत्व गुण विकास शिबीर ५ गुण - जास्तीत जास्त ३० गुण)

ड) महाविद्यालयाने आयोजित केलेल्या ७ दिवशीय निवासी शिबीरात सहभागी असल्यास ५ गुण (डे कॅम्प अंतर्भूत होणार नाही)

इ) जिल्हा / विद्यापीठ / राज्यस्तरीय शिबीर अथवा कार्यक्रमांमधील सहभाग (राज्यस्तरीय ५ गुण, विद्यापीठ ३ गुण, जिल्हा स्तरीय शिबीर / उपक्रम २ गुण जास्तीत जास्त २० गुण)

ई) रक्तदान, नेत्रदान, अवयवदान, आरोग्य शिबीरे हयामधील योगदान (आरोग्य व इतर शिबीर आयोजनात सहभाग असल्यास ५ गुण, रक्तदान केल्यास ५ गुण, नेत्रदान व अवयवदानात लोकांना प्रोत्साहित करुन ५ लोकांचे अर्ज सादर केल्यास ५ गुण एकूण जास्तीत जास्त १५ गुण)

उ) वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, जलसंवर्धन हयामधील सहभाग (वृक्षारोपण व वृक्षाचे संवर्धन केले असल्यास ५ गुण, पर्यावरण जनजागृती रॅली, प्रदर्शन किंवा व्याख्यान दिले असल्यास ५ गुण, वनराई बंधारे किंवा कोल्हापूरी बंधारे बांधण्यासाठी श्रमदान केले असल्यास ५ गुण, विहिर पुनर्भरण किंवा रेन वॉटर हार्वेस्टींग ५ गुण - जास्तीत जास्त २० गुण)

ऊ) दत्तक गावामध्ये लोकांना समाजसेवेसाठी प्रोत्साहीत करणारे कार्य व त्यासाठी दाखविलेले नेतृत्व. उदा. संपूर्ण गावातील स्वच्छता, शौचालय बांधण्यास प्रवृत्त करणे, शाळाबाह्य मुलांना शाळेत प्रवेशित करणे, नदीपात्राची स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची योग्य निगा, ऐतिहासिक स्थळांची स्वच्छता (२० गुण)

प) दत्तक गावामधील युवकांना / महिलांना कौशल्य आधारित प्रशिक्षण उपक्रमात सहभागी करणे तसेच रोजगाराभिमुख प्रशिक्षणाचे आयोजन केल्यास (१० गुण)

फ) रा.से.यो.मध्ये आपण सुचविलेले / केलेले / सृजनशील किंवा नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती (५ गुण)

ब) स्वयंमुल्यमापन व रासेयोतून आपण काय शिकलात व त्याचा जीवनात काय उपयोग झाला त्याबाबतची माहिती. त्यामुळे निर्माण झालेले एखादे कार्य (१० गुण)

भ) साक्षरता उपक्रमात सहभाग घेतला असल्यास (५ गुण)

## ४. निवड प्रक्रिया

४.१ राज्यस्तरीय पुरस्कारासाठी मंत्रालयीन स्तरावर एका समितीचे गठण करण्यात येईल. त्यांचे अध्यक्ष प्रधान सचिव / सचिव (उ.व तं.शि.वि.) असतील. रा.से.यो. राज्य संपर्क अधिकारी समितीचे संयोजक म्हणून काम बघतील. संचालक (उच्च शिक्षण), राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रादेशिक केंद्राचे प्रमुख, रा.से.यो. साठी निर्माण केलेले प्रशिक्षण संस्थेचे प्रमुख हे सदस्य असतील.

४.२ विद्यापीठ स्तरावरील निवड समितीचे अध्यक्ष कुलगुरु असतील. कार्यक्रम समन्वयक रा.से.यो. हे संयोजक म्हणून काम पाहतील. कुलसचिव, संचालक विद्यार्थी कल्याण विभाग, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक, एक विख्यात सामाजिक वैज्ञानिक किंवा एक विख्यात सामाजिक कार्यकर्ता या समितीचे सदस्य असतील. वरील समिती रा.से.यो. एककांच्या व स्वयंसेवकांच्या निवडीसाठी उत्तरदायी असेल व त्यातून उत्कृष्ट प्रस्तावांची राज्य शासनाकडे शिफारस करेल.

**४.३** +२ स्तरावरील निवड समितीचे अध्यक्ष विभागीय उपसंचालक असतील. त्या विभागातील विद्यापीठाचे कार्यक्रम समन्वयक कनिष्ठ महाविद्यालय नसलेल्या वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, एक विख्यात सामाजिक वैज्ञानिक किंवा एक विख्यात सामाजिक कार्यकर्ता या समितीचे सदस्य असतील. विभागीय सह संचालक या समितीचे संयोजक म्हणून काम बघतील.

**४.४** प्रत्येक विद्यापीठ स्तरापैकी विद्यापीठ स्तरीय समितीने एक महाविद्यालय, एक कार्यक्रम अधिकारी तसेच एक विद्यार्थी स्वयंसेवक यांची शिफारस राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष, एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१ यांचेकडे करावयाची आहे.

+२ स्तरांतर्गत येणाऱ्या प्रत्येक विभागाने त्यांच्या अंतर्गत असणाऱ्या महाविद्यालयापैकी एक महाविद्यालय तसेच एक विद्यार्थी स्वयंसेवक यांच्या प्रस्तावांची शिफारस +२ स्तरासाठी असलेल्या संचालनालयातील रा.से.यो.चे काम बघणाऱ्या सहसंचालक / कार्यक्रम समन्वयक यांच्यामार्फत राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र

शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष, एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१ यांचेकडे पाठवावयाचे आहे. **+२ स्तरासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून सहसंचालक / कार्यक्रम समन्वयकाकडे (+२ स्तर) प्रत्येक विभागातून प्राप्त झालेले महाविद्यालय तसेच कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांच्या प्रस्तावापैकी केवळ एकच प्रस्ताव त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष, एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१ यांचेकडे पाठवावयाचा आहे याची नोंद घेण्यात यावी.**

४.५ सर्व शिफारशी विभीन्न स्तरावर गुणवत्तेच्या आधारावरच करण्यात याव्यात.

४.६ विद्यापीठ संचालनालय, महाविद्यालयीन स्तर, कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक यांच्या शिफारशीसाठी जर कोणी योग्य व्यक्ती / संस्था नसेल तर विद्यापीठ / +२ स्तर संस्थेने रा.से.यो. कक्षाकडे त्यांचा प्रस्ताव पाठवू नये.

४.७ राज्य स्तरावर पुरस्कारासाठी स्थापन झालेली समिती आपल्या विवेक बुध्दीनुसार विद्यापीठ / +२ स्तरावरील समितीच्या द्वारे शिफारशी न केलेल्या विद्यापीठ / महाविद्यालय / कार्यक्रम समन्वयक विद्यार्थी स्वयंसेवक यांच्या प्रस्तावाच्या गुणवत्तेच्या आधारावर पुरस्कारासाठी विचार करु शकेल.

**४.८ राष्ट्रीय स्तरावरील रा.से.यो. पुरस्कार निवड प्रक्रिया**

राष्ट्रीय स्तरावर निवड समितीचे अध्यक्ष सचिव, युवा कार्य व क्रिडा विभाग हे असतील. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, सहसचिव, युवा कार्य, केंद्र शासन, कार्यक्रम सल्लागार, रा.से.यो., केंद्रशासन, सचिव, ए.आय.यु. आणि दोन अशासकीय विख्यात व्यक्ती या सर्वांचे सदस्य असतील. सदर समिती राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या शिफारशींची छाननी करुन पुरस्कार प्राप्त व्यक्ती / संस्थांची निवड करेल.

अ) राज्य स्तरावर पुरस्कारासाठी स्थापन झालेली निवड समिती आपल्या विवेक बुध्दीनुसार विद्यापीठ / +२ स्तरावरील समितीच्या द्वारे प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन गुण तक्त्याच्या आधारे एक विद्यापीठ / कार्यक्रम समन्वयक, २ कार्यक्रम अधिकारी /

महाविद्यालय आणि ४ स्वयंसेवक यांचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे इंदिरा गांधी राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कारासाठी शिफारस करेल (केंद्र सरकारच्या परिपत्रकानुसार त्यात बदल होऊ शकेल) या प्रस्तावामध्ये पुरुष व स्त्री स्वयंसेवकांना समान संधी दिली जाईल.

ब) समितीने शिफारस केलेल्या विद्यापीठ / महाविद्यालय / कार्यक्रम समन्वयक विद्यार्थी स्वयंसेवक यांच्या प्रस्तावाच्या गुणवत्तेच्या आधारावर प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल.

**४.९ ज्यांना मागील तीन वर्षामध्ये पुरस्कार प्राप्त झालेले आहेत त्यांचा चालू वर्षीच्या पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही.**

**५. कालमर्यादा**

विद्यापीठ / +२ स्तर, महाविद्यालय / कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी स्वयंसेवक यांचा प्रस्ताव राज्य शासनास चालू वर्षाच्या ३० एप्रिल पुर्वी (कव्हर पेज व माहिती सहीत) एक प्रत मराठी व एक प्रत इंग्रजीमध्ये अशा प्रस्तावाच्या दोन प्रती राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष, एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१ यांचेकडे प्राप्त होणे आवश्यक आहे. प्रपत्र 'एक' मध्ये स्टॅम्प साईज आकाराचे नजिकच्या काळातील एक रंगीत छायाचित्र प्रत्येक प्रस्तावास जोडणे आवश्यक आहे व त्याचप्रमाणे २ सुटे स्टॅम्प साईज आकाराचे नजिकच्या काळातील रंगीत छायाचित्र (स्टेपल न केलेले) पाठविणे आवश्यक आहे. (विद्यापीठांनी कुलगुरु व कार्यक्रम समन्वयकाचे आणि महाविद्यालयांनी कार्यक्रम अधिकारी व प्राचार्यांचे तथा स्वयंसेवकांनी स्वत:चे) राज्यस्तरीय पुरस्कार समारंभ २४ सप्टेंबर रा.से.यो. दिनी आयोजित करण्यात येईल. त्यासंबंधी पुरस्कार प्राप्त व्यक्तींना समारंभाबद्दलची माहिती देण्यात येईल.

५.१ विद्यापीठ / +२ स्तर, महाविद्यालय, कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी स्वयंसेवकांना योजनेच्या प्रस्तावाच्या प्रपत्राचा नमुना माहितीसाठी जोडपत्र १, २ व ३ (इंग्रजी व मराठी) मध्ये देण्यात आलेला आहे.

## ६. पुरस्काराचे स्वरुप

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | पुरस्कारांची संख्या | पुरस्काराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | अ) उत्कृष्ट विद्यापीठ / +२ स्तर पुरस्कार (संपूर्ण महाराष्ट्रातून एक)<br>ब)एकापेक्षा जास्त पुरस्कार असल्यास छोट्या विद्यापीठांना एक प्रशंसा प्रमाणपत्र | १<br>१ | स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र<br>प्रशंसा प्रमाणपत्र |
| २ | अ)उत्कृष्ट महाविद्यालय / संस्था (एकक) पुरस्कार<br>ब)कनिष्ठ महाविद्यालयास उपरोक्त चार पुरस्कारात समावेश नसल्यास एक प्रशंसा प्रमाणपत्र | ४<br>१ | स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र<br>प्रशंसा प्रमाणपत्र |
| ३ | उत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक (एक पुरस्कार ज्या विद्यापीठास पुरस्कार देण्यात येईल त्याच विद्यापीठाचे कार्यक्रम समन्वयक) | १ | स्मृतीचिन्ह व रु.१०,०००/- |
| ४ | अ)उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी<br>ब)कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी उपरोक्त चार पुरस्कारात समावेश नसल्यास एक प्रशंसा प्रमाणपत्र<br>क)उपरोक्त ५ कार्यक्रम अधिकारी व्यतिरिक्त गुण तक्त्याच्या नंतरच्या ५ कार्यक्रम अधिकाऱ्यांना प्रशंसा प्रमाणपत्र | ४<br>१<br>५ | स्मृतीचिन्ह व रु.५,०००/-<br>प्रशंसा प्रमाणपत्र<br>प्रशंसा प्रमाणपत्र |
| ५ | उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार (प्रत्येक विद्यापीठातून व संचालनालय स्तरावरील प्रत्येकास एक असे एकूण २५ पुरस्कार) | २५ | स्मृतीचिन्ह व रु.२,०००/- प्रत्येकी |

६.१पुरस्कार प्राप्त कार्यक्रम समन्वयक / कार्यक्रम अधिकारी तसेच विद्यार्थी स्वयंसेवकांना प्रमाणपत्र सुध्दा देण्यात येईल.

६.२ पुरस्कार प्राप्त स्वयंसेवकांनी ते ज्या महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण करतील त्या महाविद्यालयातील त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर किमान एक वर्ष तरी रा.से.यो.च्या

विशेष शिबीर कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन त्या महाविद्यालयाला मदत करणे आवश्यक आहे.

६.३ राज्य शासनाकडे विद्यापीठ / +२ स्तरावरुन प्रस्ताव पाठविला म्हणजे पुरस्कार मिळालाच असे गृहित धरण्यात येऊ नये. निवड समिती पुरस्कार न देण्याचा निर्णय देखील घेऊ शकते.

*******

Paste Passport Size PHOTO

## Proforma for Recommending NSS UNIT & PROGRAMME OFFICER for INDIRA GANDHI NSS AWARDS

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of the State | |
| 2 | Name of the University / +2 Council, | |
| 3 | Name of the College/ School<br>(with address and other contact particulars) | |
| 4 | Name of the Principal of College/ School<br>(with contact particulars) | |
| 5 | Name, Sex (Male/ Female) and contact particulars of the Programme Officer. | |
| 6 | Name of NSS Unit which is being recommended for Award and date from which the NSS Unit is in existence. * | |
| 7 | Period of Service as Programme Officer of the NSS unit | From : To: |
| 8 | Whether the Programme Officer is trained at ETI? | Yes/ No |
| 9 | Whether strength of NSS Unit being recommended for Award is as per guidelines during last 3 years?<br>[Please indicate allocation of target and actual enrolment during last 3 years i.e. during 2013-14, 2014-15 & 2015-16] | |
| 10 | Adoption of villages/ slums and completion of Special Camping against targets.<br>[Please indicate target of Special Camping and actual achievement during last 3 years i.e. during 2013-14, 2014-15 & 2015-16] | |
| 11 | Whether the Programme Officer has been convicted by a court of law or any case/ investigation is pending against him/ her?<br>[Certificate from the competent authority of the College/School to be attached.] | |
| 12 | Performance/ Significant Achievements of the NSS Unit during 2013-14, 2014-15 & 2015-16<br>(Extra sheets for details of the achievements):<br>a) Plantation (No. of Programmes organised and saplings planted)<br>b) Blood Donation (No. of Camps organised and blood units donated)<br>c) Health/ Eye/ Immunisations Camps (No. of Camps organised)<br>d) Awareness Programmes (AIDS/ Environment/ Others)<br>(No. of Programmes organised)<br>e) Creation of Durable Assets (Estimated value of Assets)<br>f) Awards received<br>(Details of Awards received)<br>g) Other Outstanding Achievements (Details of achievements) | |
| 13 | Whether the duly filled-up check list has been attached? | Yes/ No |
| 14 | Other Remarks, if any | |

*The NSS Unit to be considered for the Award shall be a single NSS Unit. Thus, in case a Programme Officer is in-charge of more than one NSS Units for any reason, one of such Units should be identified and all the data in this Proforma should be furnished for that particular unit only.

| | | |
|---|---|---|
| Signature of the<br>Programme Officer | Signature of the<br>Principal | Signature of the<br>Programme Co-ordinator |
| Signature of the<br>Vice Chancellor/<br>Chairman | Signature of the<br>State Liaison Officer | Signature of the Competent<br>Authority in the State |

# Proforma for Recommending NSS VOLUNTEER for INDIRA GANDHI NSS AWARDS

Paste Passport Size PHOTO

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of the State | |
| 2 | Name of the University / +2 Council, | |
| 3 | Name of the College/ School<br>(with contact particulars) | |
| 4 | Name of the Principal of College/ School<br>(with contact particulars) | |
| 5 | Name, Sex (Male/ Female), Address and other contact particulars (Landline/ Mobile No., e-mail address etc.) of the Volunteer being recommended. | |
| 6 | a) Date of Birth of the Volunteer<br>b) Category (Gen/SC/ST)<br>[Documentary Evidence for Date of Birth and SC/ST relaxation to be enclosed.] | |
| 7 | Period of Volunteership of the Volunteer. | From : To: |
| 8 | Number of Hours completed during Volunteership. | |
| 9 | Details regarding Participation in Special Camp. | |
| 10 | Details regarding Participation in National/ Regional level NSS Programmes. | |
| 11 | Whether the Volunteer has been convicted by any court of Law or any case/ investigation is pending against him/ her? [Certificate from competent authority of the College/ School to be attached]. | |
| 12 | Performance/ Significant Achievements of the NSS Volunteer during the 2 year period of Volunteership (Extra sheets for details of the achievements):<br>a) Plantation (No. of Programmes attended and saplings planted)<br>b) Blood Donation (No. of Camps attended and blood units donated)<br>c) Health/ Eye/ Immunisations Camps (No. of Camps attended)<br>d) Awareness Programmes (AIDS/ Environment/ Others) (No. of Programmes attended)<br>e) Awards received (Details of Awards received)<br>f) Other Outstanding Achievements (Details of achievements) | |
| 13 | Whether the duly filled-up check list has been attached? | Yes/ No |
| 14 | Other Remarks, if any | |

**Note :** Since the Award is for the 2015-16, the Volunteers completing their 2 year's volunteership during 2015-16 only are to be considered. The volunteers completing their volunteership prior to 2015-16 cannot be considered for the Award. For the same reason, the achievements of the volunteer shall be considered for the 2 year volunteership period, which would fall within last 3 years, i.e. 2013-14, 2014-15 and 2015-16.

Signature of the Volunteer

Signature of the Programme Officer

Signature of the Principal

Signature of the Programme Co-ordinator

Signature of the Vice Chancellor/ Chairman

Signature of the State Liaison Officer

Signature of the Competent Authority in the State

Paste
Passport
Size
PHOTO

# राज्यस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्रस्तावाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयाचे नांव व पत्ता | |
| २ | प्राचार्यांचे नांव | |
| ३ | स्वयंसेवकाचे नांव | |
| ४ | अ)लिंग<br>ब) जन्मतारीख (जन्मतारखेच्या पुराव्यासह)<br>क)जात (अनुसूचित जाती/जमाती/सर्वसाधारण) | |
| ५ | निवासी पत्ता, दुरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी आणि ई-मेल | |
| ६ | स्वयंसेवक म्हणून किती तास काम केले | |
| ७ | राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक म्हणून कालावधी | |
| ८ | राष्ट्रीय सेवा योजना डायरी तयार केली आहे काय ? | |
| ९ | किती विशेष शिबीरात सहभाग घेतला आहे? सदर शिबीरात आपण काय शिकलात? सदर शिबीरात आपले योगदान | |
| १० | जिल्हा / विद्यापीठ / राष्ट्रीय स्तरीय शिबीरामधील सहभाग | |
| ११ | न्यायिक अथवा अन्य कुठल्याही प्रकारची चौकशी चालू आहे काय ? (सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे) | |
| १२ | स्वयंसेवकाने गेल्या २ वर्षामध्ये केलेल्या उपक्रमांची / साध्य केलेल्या महत्वपूर्ण गोष्टी<br>अ)वृक्षारोपण (उपक्रमांची संख्या आणि लागवड केलेली रोपे)<br>ब) रक्तदान (किती शिबीरांमध्ये सहभागी आणि कितीवेळा रक्तदान केले)<br>क) आरोग्य/नेत्र चिकित्सा आणि लसीकरण शिबीरे (किती शिबीरांमध्ये सहभागी झाले)<br>ड) जनजागृती उपक्रम : एडस्, पर्यावरण, रस्ता सुरक्षा, स्वच्छता आणि इतर (उपक्रमांची संख्या)<br>इ) प्राप्त पुरस्कार (किती पुरस्कार प्राप्त झाले, त्याची माहिती) | |
| १३ | इतर उल्लेखनीय कामगिरी (संक्षिप्त स्वरुपामध्ये माहिती) | |
| १४ | उत्तीर्ण झालेली परीक्षा | |
| १५ | स्वयं मुल्यमापन (इतर आणि सर्वसाधारण अभिप्राय) | |

स्वयंसेवकाची स्वाक्षरी — कार्यक्रम अधिकारी स्वाक्षरी व शिक्का

प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का — कार्यक्रम समन्वयक स्वाक्षरी व शिक्का

कुलगुरु स्वाक्षरी व शिक्का — राज्यसंपर्क अधिकारी व वि.का.अ. स्वाक्षरी व शिक्का

# राज्यस्तरीय उत्कृष्ट एकक / कार्यक्रम अधिकारी पुरस्कार प्रस्तावाचा नमुना

Paste Passport Size PHOTO

| | | |
|---|---|---|
| १ | राज्य | |
| २ | विद्यापीठाचे नांव | |
| ३ | महाविद्यालय / संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता /दूरध्वनी क्रमांक / ई-मेल | |
| ४ | प्राचार्यांचे नांव, निवासी पत्ता व दूरध्वनी क्रमांक,ई-मेल, मोबाईल क्रमांक<br>पिनकोड क्रमांक | |
| ५ | कार्यक्रम अधिकाऱ्याचे नाव व निवासी पत्ता व दूरध्वनी क्रमांक,ई-मेल, मोबाईल क्रमांक<br>पिनकोड क्रमांक | |
| ६ | राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून सेवाकाल | |
| ७ | कार्यक्रम अधिकारी प्रशिक्षीत आहे काय? (असल्यास प्रमाणपत्र जोडावे) | |
| ८ | पुरस्कारासाठी कार्यरत असलेले एकक किती व कधीपासून कार्यरत आहे? | |
| ९ | मागील ३ वर्षातील मंजूर व प्रत्यक्ष नोंदविलेली विद्यार्थी संख्या | |
| १० | विशेष शिबीर कार्यक्रमाचे उदिष्ट | |
| ११ | दत्तक गावाचे नांव / नागरी वस्ती संपर्क साधावयाच्या व्यक्तीचे नांव व महाविद्यालयापासून अंतर | |
| १२ | महाविद्यालय व कार्यक्रम अधिकारी यांनी गेल्या तीन वर्षामध्ये राबविलेले महत्वपूर्ण उपक्रम<br>अ)वृक्षारोपण (वृक्षारोपण कार्यक्रमांची संख्या व वृक्ष लागवड)<br>ब) रक्तदान (किती शिबीरे आयोजित केली आणि किती रक्त बाटल्यांचे रक्त संकलन झाले)<br>क) आरोग्य/नेत्र चिकित्सा आणि लसीकरण शिबीरे (किती शिबीरे आयोजित केली)<br>ड) जनजागृती उपक्रम : एडस्, पर्यावरण, रस्ता सुरक्षा, स्वच्छता आणि इतर (उपक्रमांची संख्या)<br>इ) प्राप्त पुरस्कार (किती पुरस्कार प्राप्त झाले, त्याची माहिती) | |
| १३ | मागील तीन वर्षात उभारण्यात आलेले स्थायी प्रकल्प कार्य व त्याचे रुपयामध्ये मुल्यांकन (सविस्तर तपशील जोडावा) | |

| | | |
|---|---|---|
| १४ | रासेयो उपक्रम अधिक गतीशील करण्यासाठी स्वयंसेवक कार्यक्रम अधिकारी यांनी इतर संस्थांच्या माध्यमातून केलेले प्रयत्न | |
| १५ | अहवाल व लेखे पाठविण्यातील सातत्य अहवाल कोणत्या महिन्यात पाठविले आहेत? लेखे कोणत्या महिन्यात विद्यापीठास सादर केले आहेत ? तपशील लिहावा. | |
| १६ | कोणतीही न्यायिक अथवा उपविभागीय चौकशी कार्यक्रम अधिकाऱ्याविरुध्द चालू आहे काय ? | |
| १७ | स्वच्छता मोहिमेसाठी दत्तक घेतलेल्या गावामधील सद्यस्थिती तसेच उपक्रमांची एकूण संख्या | |
| १८ | राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंमुल्यमापन | |
| १९ | राष्ट्रीय सेवा योजनेत आपण केलेल्या नाविन्यपूर्ण /सृजनशील उपक्रमांचा तपशील | |
| २० | जिल्हा / विद्यापीठ / राज्य / राष्ट्रीय स्तरावरील विविध उपक्रमांतील योगदान | |
| २१ | अभिप्राय, काही असल्यास | |
| २२ | महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना विभागास पुरविलेल्या सेवा व सुविधा | |

कार्यक्रम अधिकाऱ्याची यांची स्वाक्षरी व शिक्का

मा.प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का

मा.कार्यक्रम समन्वयकांची यांची स्वाक्षरी व शिक्का

मा.कुलगुरु स्वाक्षरी व शिक्का

मा.राज्यसंपर्क अधिकारी यांची स्वाक्षरी व शिक्का

पुरस्कार प्रस्तावाशी संबधित खालीलप्रमाणे माहिती महाविद्यालयाने स्वतंत्रपणे (प्रस्तावाबरोबर) सादर करावी.

## **कार्यक्रम अधिकारी**/ एकक प्रस्तावाची माहिती (2015-16)

| अ .क्र | कार्यक्रम अधिका-याचे व महाविद्यालयाचे नांव | रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी याचा प्रशिक्षणाचा सेवाकाळ. | पुरस्काराकरिता प्रस्तावित असलेले एकक किती वर्षापासून कार्यरत आहे. | मागिल तीन वर्षातील मंजूर व प्रत्यक्ष नोंदविलेले विद्यार्थी | | | विशेष शिबीर कार्यक्रमाचे उद्दिष्ट | | | शिबीरातील मंजूर संख्या आणि सहभाग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | | | 6 | | | 7 | | |
| | | | | वर्ष | मंजूर | प्रत्यक्ष | वर्ष | उद्दिष्ट | पूर्तता | वर्ष | नोदणी | शिबीर |
| | | | | २०१३-१४ | | | २०१३-१४ | | | २०१३-१४ | | |
| | | | | २०१४-१५ | | | २०१४-१५ | | | २०१४-१५ | | |
| | | | | २०१५-१६ | | | २०१५-१६ | | | २०१५-१६ | | |

| दत्तक गावाचे नाव,नागरी वस्ती संपर्क साधावयाच्या व्यक्तिचेनाव व महाविद्यालयापासून अंतर आणि राबविलेले उपक्रम | दत्तक गावामधील साध्य केलेले साक्षरतेचे प्रमाण | मागिल दोन वर्षात उभारण्यात आलेले स्थायी प्रकल्पांबाबतची माहिती | रा.से.यो. उपक्रम अधिक कृतीशिल करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी स्वयंसेवक व इतर संस्थांच्या माध्यमातून केलेले प्रयत्न | अहवाल व लेखे पाठविण्यातील सातत्य व अहवाल कोणत्या महिन्यात विद्यापीठाला सादर केला | कार्यक्रम अधिका-या विरुध्द कोणती न्यायिक अथवा विभागीय चौकशी चालू आहे काय ? |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | |

| महाविद्यालयाने विविस विविस शिबीरासाठी विद्यार्थ्यांनी प्रोत्साहित केले असल्यास शिबीराचे नांव विद्यार्थी संख्या | रासेयोतील शास्वत कामाचे मुल्यमापन /मुल्यांकन | रासेयोत केलेल्या नाविन्यपूर्ण / सृजनशिल उपक्रमांचा तपशिल तपशिल | जिल्हा / विद्यापीठ / राज्य / राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमातील योगदान,आयोजन | मागील तीन वर्षातील समाजोपयोगी (अगोदर नोंदणी झालेल्या उपक्रमां व्यतिरिक्त) | महाविद्यालयाला/ रासेयोला प्राप्त झालेले पुरस्कार (विद्यार्थी आणि कार्यक्रम अधिकारी) | मागील 3 वर्षात महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावास राज्य शासनाचा स्वच्छतेवर आधारित निर्मलग्राम किंवा तत्सम पुरस्कार | महाविद्यालयातील शिबीरात सह प्राध्यापकाचे उपक्रम राबविण्यासाठी दिलेले योगदान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **13** | **14** | **15** | **16** | **17** | **18** | 19 | 20 |
| | | | | | | | |

पुरस्कार प्रस्तावाशी संबधित खालीलप्रमाणे माहिती महाविद्यालयाने स्वतंत्रपणे (प्रस्तावाबरोबर) सादर करावी.

## **स्वयंसेवक** प्रस्तावाची माहिती (2015-16)

| **अ.क्र.** | **स्वयंसेवक/महाविद्यालय/ विद्यापीठाचे नांव** | **रासेयोमध्ये स्वयंसेवक 240 तासापेक्षा जास्त तास केले असल्यास तासांची नोंद** | **राज्य शासनाने राबविलेल्या उपक्रमांमध्ये सहभाग असल्यास (राज्य प्रजासत्ताक दिन संचलन, आव्हान आपत्ती व्यवस्थापन शिबीर, उत्कर्ष, सामाजिक सांस्कृतिक महोत्सव, प्रेरणा नेतृत्व गुण विकास शिबीर,** | **रासेयो दैनदिनी तयार केली आहे काय? असल्यास प्रत जोडावी** | **किती विशेष शिबीरात सहभाग घेतला व सदर शिबीरात शिबीरात आपण काय शिकलात व आपले योगदान** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

| जिल्हा/विद्यापीठ/ज्यस्तरावरील शिबीर/कार्यकमांन सहभाग | रक्तदान/नेत्रदान/अवयव दान आरोग्य शिबीरे | वृक्षरोपण/पर्यावरण संवर्धन जलसंवर्धन या मधील सहभाग | दत्तक गांवामध्ये समाजसेवेसाठी प्रोत्साहित करणारे कार्य व त्यासाठी दाखविलेले नैतृत्व | न्यायिक अन्य कुठल्याही प्रकारची चौकशी चालू आहे काय? | दत्तक गांवामधील युवकांना / महिलांना कौशल्य आधारित प्रशिक्षण उपक्रमात सहभागी करणे तसेच रोजगारभिमुख प्रशिक्षणाचे अयोजन केल्यास | स्वयंमुल्यमापन व रासेयो तून आपण शिकलात व त्याचा जीवनात कसा उपयोग होतो, त्याबाबतची माहिती | रासेयो मध्ये आपण सुचविलेले/केलेले सृजनशील/नाविन्यपूर्ण उपक्रमाची माहिती | साक्षारता उपक्रमात सहभाग घेतला असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | | |